| MHNS210005502023 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक : | ०२/०९/२०२३ |
| | नोंदणी दिनांक : | ०२/०९/२०२३ |
| | निकाल दिनांक : | २०/०४/२०२६ |
| | कालावधी : | वर्ष ०२ महिने ०७ दिवस १८ |

## [ Chapter VI of Criminal Manual of Para 44(i) ]

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मनमाड शहर यांचे न्यायालयात.**
**ठिकाण — मनमाड, जि. नाशिक.**
**(पिठासीन अधिकारी के.आर.मोरे)**
दि.२० एप्रिल २०२६

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२६४/२०२३.** **निशाणी क्रमांक १६**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>मनमाड शहर पोलिस ठाणे जि.नाशिक |
| **फिर्यादीतर्फे** | सरकारी अभियोक्ता श्री.ए.एस.पाटील |
| **आरोपी** | **नितीन मनोहर आहेर,** वय : ३५ वर्षे,<br>रा.हिसवळ रोड, मांडवड ता. नांदगाव जि.नाशिक |
| **आरोपीतर्फे** | विधिज्ञ श्री.एस.एम.व्यवहारे |

## [Chapter VI of Criminal Manual of Para 44(ii)]

| | |
|---|---|
| **अपराध घडल्याची तारीख** | १८.०१.२०२३ |
| **प्रथम खबर अहवाल नोंद दिनांक** | १८.०१.२०२३ |
| **दोषारोप पत्र दाखल दिनांक** | २५.०४.२०२३ |
| **दोषारोप नोंदविल्याचा दिनांक** | ०८.०२.२०२४ |
| **साक्षीस आरंभ केल्याचा दिनांक** | २५.०६.२०२४ |
| **न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक** | ——— |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | २०.०४.२०२६ |
| **जर असेल तर शिक्षेच्या आदेशाची तारीख** | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामिनावर मुक्त केल्याचा दिनांक | गुन्हा आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नितीन मनोहर आहेर | सी.आर.पी.सी. ४१(१) प्रमाणे नोटीस दिली | सी.आर.पी.सी. ४१(१) प्रमाणे नोटीस दिली | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५—ई प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

## [Chapter VI of Criminal Manual of Para 44(iii)]

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार:

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय, पंच व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **सा.क्र.१** | संदीप रामदास बहिरम/नि.क्र.९ | प्रथम खबर देणार |
| **सा.क्र.२** | सुधाकर पोपट सोमासे/नि.क्र.९ | पंच |
| **सा.क्र.३** | एस.के.सुरासे/नि.क्र.१२ | दाखल अंमलदार |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार :

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **निरंक** | | |

### क. न्यायालयाचे साक्षीदार :

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **निरंक** | | |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाने दिलेल्या निशाण्यांची यादी

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.१०/सा.क्र.१ | प्रथम खबर अहवाल |
| १. | निशाणी क्र.१३/सा.क्र.३ | आदेश |

**ब. बचाव पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | **निरंक** | |

**क. न्यायालयातर्फे :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.९ | आरोपीचे प्रतिकथन व आरोपीचे गुन्हा नाकबुलीचे निवेदन |

**ड. भौतिक वस्तू**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | **निरंक** | |

## :: न्यायनिर्णय ::

(दिनांक — २०/०४/२०२६ रोजी घोषित)

आरोपी विरूध्द 'महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम' कलम — ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाचे प्रतिकथन नोंदवुन संपरीक्षा चालविणेत आली आहे.

२. अभियोगपक्षातर्फे तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन (नि.क्र.१५) नोंदविण्यात आले. आरोपीने त्याचेविरूध्द केस मध्ये पंच होण्यास नकार दिला म्हणून खोटा खटला केल्याचा बचाव घेतला आहे.

३. अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा तसेच दोन्ही पक्षाच्या युक्तीवादावरून प्रस्तुत खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी उदभवलेले मुददे, निष्कर्ष व निष्कर्षा मागील कारणे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, आरोपी विनापरवाना देशी विदेशी दारू विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करतांना मिळून आला म्हणून 'महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम' कलम – ६५(ई) नुसार शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अंतिम आदेश? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

४. आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने प्रथम खबर देणार साक्षीदार क्रमांक १ संदीप , पंच सा.क्र.२ सुधाकर, दाखल अंमलदार सा.क्र.३ यांची साक्ष अनुक्रमे निशाणी क्रमांक ९, ९ व १२ अन्वये नोंदविली आहे. आरोपीने बचावाचे साक्षीदार तपासलेले नाहीत.

## :: <u>कारणमिमांसा</u> ::

**<u>मुददा क्र.१ करीता :</u>**

५. अभियोगपक्षाने त्यांची बाजू सिद्ध करण्याकामी आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या देशी व विदेशी दारू बाळगून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम' कलम – ६५(ई) अन्वये गुन्हा केल्याचे सिद्ध करणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाने तीन साक्षीदार तपासले असून त्यापैकी सा.क्र.१ व ३ यांचे साक्षीप्रमाणे आरोपी विरूद्ध सदोष पुरावा आढळून आल्याने आरोपी गुन्हयास पात्र ठरतो असा युक्तीवाद केला. याउलट आरोपीच्या विधिज्ञांनी आरोपीला केवळ पंच म्हणून हजर राहण्यास सांगितले असता त्याने नकार दिला म्हणून त्याचे विरूद्ध खोटी केस केल्याचे बचाव घेवून आरोपी विरूद्ध कोणताही पुरावा नसल्याने त्यास निर्दोष मुक्त करण्यात यावे असा युक्तीवाद केला.

६. अभियोग पक्षाने प्रथम खबर देणार साक्षीदार क्र. १ श्री. संदीप बहिरम यास निशाणी क्र.९ वर तपासले असून त्यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दि.१८.०१.२०२३ रोजी त्यांना मिळालेल्या माहितीनुसार एक

इसम हॉटेल प्रदीप येथे बेकायदेशिररित्या देशी विदेशी दारूची विक्री करत असल्याबाबत माहिती मिळाली होती. त्यानंतर एक वाजता छापा कारवाई केली असता घटनास्थळावर ऑफीसर्स चॉइस ब्लु नावाची १६ बाटल्या व देशी भिंगरी नावाच्या १९ बाटल्या जप्त करण्यात आल्या होत्या व त्यानंतर पंचनामा करून त्यांनी फिर्याद दाखल केली होती. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की धटनेची माहिती त्यांना कोणी दिली याबाबत नमुद नसून हॉटेल प्रदीप यांचे ७/१२ उतारा, शॉप ॲक्ट लायसन्स जप्त केले नाही. आरोपीच्या विधिज्ञांनी केलेल्या इतर विधानांना त्याने दुजोरा दिला नाही. सा.क्र.२ हा पंच साक्षीदार असून त्याने अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. तसेच दि.१८.०१.२०२३ रोजी पोलिसांनी त्याला पंचनाम्याकामी बोलावल्याचे त्याने अमान्य केले आहे. सा.क्र.३ एस.के.सुरासे हे दाखल अंमलदार असून त्यांनी गुन्हयाची फिर्याद महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम' कलम – ६५(ई) कायदयाअंतर्गत आरोपी नितीन आहेर यांचे विरूद्ध दाखल केल्याचे सांगितले आहे. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की घटनेबद्दल त्यांना प्रत्यक्ष माहिती नसून आरोपी कोण आहे, कोठे राहतो हे देखील त्यांना प्रत्यक्ष माहिती नाही. तसेच प्रथम खबर देणार संदीप बहिरम व पी.एस.आय.कचरे हे आरोपीला मनमाड पोलिस ठाणे येथे घेउन आल्यानंतर त्यांना घटनेबाबत समजले होते.

७. वरील साक्षीदाराच्या साक्षींचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, छापा कारवाईमध्ये ज्या इसमास पकडले होते त्या इसमाचे नाव प्रथम खबर देणा–याने त्याचे पुराव्यामध्ये नमूद केले नसून नमूद आरोपी हा दि. १८.०१.२०२३ म्हणजेच घटनेच्या वेळी घटनास्थळावर हजर होता ही बाब सिद्ध झाली नाही. तसेच मौजे नागापूर येथे हॉटेल प्रदीप हे वर्दळीचे ठिकाण असून देखील स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही. प्रथम खबर देणार कोणत्या खाजगी वाहनाने आरोपीला पकडण्यास गेले, कोण पंच म्हणून उपस्थित होते, पंचांची नावे याबाबत प्रथम खबर देणार यांनी स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे छापा कारावाई दरम्यान आरोपीचे ताब्यातुनच देशी विदेशी दारू जप्त करण्यात आली असा निष्कर्ष काढता येणार नाही. छापा कारवाईचे ठिकाण हे लोकवस्तीचे ठिकाण

असल्यामुळे छाप्याबाबत स्वतंत्र साक्षीदार सहज उपलब्ध झाले असते. परंतु छापा कारवाईतील पंच तपासण्यात आले नसून स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब अथवा साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे घटना व छापा कारवाईबाबत स्वतंत्र साक्षीदार नसल्याने तशी घटना अथवा छापा घडला किंवा नाही याबाबत संशय निर्माण होतो. तसेच छापा कारवाईसाठी गेल्याबाबत पोलीस ठाण्यात ठेवलेले लॉग रजिस्टर अथवा इतर कोणताही अभिलेख दाखल केलेला नाही. त्यामुळे छापा कारवाई झाली किंवा नाही याबाबत संशय निर्माण होतो.

८ रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल जरी अभिलेखावर दाखल असला तरी, मुद्देमाल जप्त केल्यापासुन तो रासायनिक पृथक्करणासाठी पाठवेपर्यंतचा कालावधीमध्ये मुद्देमाल कोठे व कोणत्या परिस्थीतीत ठेवला होता याबाबत प्रथम खबर देणार साक्षीदार क्र.१ ने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच तोच मुद्देमाल आरोपीकडून हस्तगत केला असे देखील स्पष्ट अभिलेखावर आलेले नाही. त्यामुळे विश्लेषणासाठी पाठविलेला मुद्देमाल नेमका कुठला व कशा परिस्थीतील होता हे शाबीत झालेले नाही. तसेच अभियोग पक्षाने मुळत: मुद्देमाल आरोपीकडुन जप्त केला हेच सिध्द केलेले नसल्यामुळे वैज्ञानिक प्रयोग शाळेचे प्रमाणपत्र जरी दाखल असले तरी त्याचा अभियोग पक्षाला काहीएक उपयोग नाही.

९. वरील चर्चेअंती असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष हे आरोपीने देशी विदेशी दारू बेकायदेशीररित्या विक्री केली असे संशयापलिकडे सिध्द करू शकलेला नाही त्यामुळे आरोपीने बेकायदेशिररित्या दारू विक्री केल्याचा गुन्हा केल्याचे सिध्द होत नाही. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर **नकारार्थी नोंदविण्यात येते.**

**मुददा क्र.२ करीता :**

१०. आरोपीने त्याच्या बेकायदेशिररित्या विनापरवाना देशी विदेशी दारू विक्री करण्याच्या इराद्याने स्वत:जवळ बाळगली ही बाब नि:संशयपणे शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपीला 'महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम' कलम — ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयात दोषी ठरविता येणार नाही. तसेच

खटल्यातील जप्त मुद्देमाल १९ देशीदारू भिंगरी संत्रा या नावाचे लेबल असलेल्या १८० मिलीच्या बाटल्या व १६ ऑफीसर्स चॉईस ब्लु नावाचे लेबल असलेल्या १८० मिलीच्या काचेच्या बाटल्या या अपिल कालावधी नंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, नाशिक यांना कायदेशीर विल्हेवाट करण्याकरिता सुपूर्त करण्यात याव्यात. वरील निष्कर्षावरून मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी **नितीन मनोहर आहेर** यांची महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५(ई) नुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| **२.** | आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन पत्र रदद करण्यात येते. |
| **३.** | आरोपी यांस निर्देषित करण्यात येते की, त्यांनी कलम ४३७ अ(१) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार त्याचे रक्कम रू १५०००/— चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र दयावेत. |
| **४.** | जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर नष्ट करणेकामी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ अन्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठविण्यात यावा. |

KRANTI RAMESH MORE
Digitally signed by KRANTI RAMESH MORE
Date: 2026.04.20 15:03:04 +0530

**दिनांक : २०/०४/२०२६.**
**ठिकाण :मनमाड**

**(के.आर.मोरे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**शहर न्यायालय, मनमाड**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहेत.

लघुलेखकाचे नांव — श्रीमती व्हि.जे.मोरे
न्यायालयाचे नाव — न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग—१, मनमाड शहर

आदेश दिनांक : २०/०४/२०२६.
पिठासीन अधिका—यानी स्वाक्षरी केलेली तारीख : २०/०४/२०२६.
आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख : २०/०४/२०२६.